—: **प्रेसनोट** :— दिनांक : २३/०३/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १८/२०२२ |
| कलम | कलम ७, १२ भ्र. प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) यशवंत गणपत गोसावी, वय ५४ वर्षे, पद मिळकत व्यवस्थापक (वर्ग—३), म्हाडा, कलानगर, बांद्रा पूर्व<br>२) संदिप किशनराव पांचाळ, वय ३६ वर्षे, पद वरिष्ठ लिपीक (वर्ग—३), म्हाडा, कलानगर, बांद्रा पूर्व |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ७५०००/— |
| स्विकारलेली रक्कम | रू. ७५,०००/— |
| हस्तगत केलेली रक्कम | रू. ७५,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे नातेवाईक यांना अल्प उत्पन्न गटातून लॉटरी सोडत पध्दतीने म्हाडा तर्फे गाळा/सदनिका मिळालेली होती. सदर गाळयाचा ताबा मिळण्यासाठीच्या सर्व कायदेशीर प्रक्रिया त्यांनी पूर्ण केल्या होत्या.<br><br>तरीही सदर गाळयाचा ताबा पत्र/ताबा पावती देवून सदनिका हस्तांतरित करण्यासाठी म्हाडा कार्यालयातील पणन विभागातील मिळकत व्यवस्थापक यशवंत गणपत गोसावी यांनी तक्रारदार यांचेकडे रु. ७५,०००/— लाचेची मागणी केलेली होती.<br><br>आलोसे यांना लाच देण्याची तक्रारदार यांची इच्छा नसल्याने त्यांनी लाप्रवि, मुंबई कार्यालयात लेखी तक्रार दिली. दि. २२/०३/२०२२ रोजी पडताळणी दरम्यान आलोसे याने पंचासमक्ष रू. ७५,०००/— लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने, आज रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये आलोसे क्र. ०१ यांनी तक्रारदार यांचेकडून रू. ७५,०००/— स्विकारले व त्यापैकी रू. २५,०००/— आलोसे क्रं. ०२ यांना तक्रारदारांचे काम करण्यासाठी दिले.<br>ला.प्र.वि., मुंबई विभागाकडून करण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये आलोसे क्र. ०१ यांचेकडून रू. ५०,०००/— व आलोसे क्रं. ०२ यांचेकडून रू.२५,०००/— असे एकूण रू. ७५,०००/— पंचासमक्ष हस्तगत करण्यात आलेले आहेत. वर नमूद आलोसे यांना लाच घेताना रंगेहात पकडून त्यांचेविरोधात वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. |

पोलीस आयुक्त ... लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

२३/३/२२

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.**

**संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.**
**संकेतस्थळ—acbmaharashtra.gov.in**
**ईमेल :(1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**ऑन लाईन तक्रार ॲप्लीकेशन- www.acbmaharashtra.net**
**टोलफ्री क्र.१०६४**
**दूरध्वनी क्र.०२२—२४९२१२१२,फॅक्स क्र.०२२—२४९२२६१८,**
**व्हॉट्स ॲप क्रमांक—९९३०९९७७००**

Scanned with CamScanner